5 July 2026

| | |
|---|---|
| To,<br>The Manager<br>Listing Department<br>BSE Limited<br>Phiroze Jeejeebhoy Towers<br>Dalal Street<br>Mumbai - 400 001 | To,<br>The Manager<br>Listing Department<br>National Stock Exchange of India Limited<br>Exchange Plaza, C-1 Block G<br>Bandra - Kurla Complex, Bandra (East)<br>Mumbai - 400 051 |
| **BSE Code: 544252** | **NSE Code: BAJAJHFL – EQ** |

Dear Sir/Madam,

**Sub.: Newspaper Advertisement - Disclosure under SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ('SEBI Listing Regulations')**

Pursuant to the SEBI Listing Regulations, we enclose herewith copy of advertisements published in Financial Express – all editions (English) and Kesari – Pune edition (Marathi), today on 5 July 2026, concerning 18th Annual General Meeting to be held on Wednesday, 29 July 2026 at 3:45 p.m. through Video Conferencing ('VC')/Other Audio-Visual Means ('OAVM') and E-voting information.

The aforesaid advertisements are also being made available on the website of the Company at https://www.bajajhousingfinance.in/annual-reports.

We request you to kindly take this on record.

Thanking you.

For **Bajaj Housing Finance Limited**

ATUL PATNI
Digitally signed by ATUL PATNI
Date: 2026.07.05 15:17:16 +05'30'

**Atul Patni**
**Company Secretary**
Email ID: bhflinvestor.service@bajajhousing.co.in
Encl.: As above
CC: Catalyst Trusteeship Limited, Pune (Debenture Trustee)

# प्रज्ञानानंद संयुक्तपणे अव्वल स्थानी

**झाग्रेब :** भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदने ग्रँड चेस टूरच्या क्रोएशियन लेगच्या रॅपिड विभागाच्या अंतिम दिवशी उत्कृष्ट कामगिरी करत सलग तीन सामने जिंकून फ्रान्सच्या फिरौजा अलीरेझासोबत एकूण १२ गुणांसह संयुक्तपणे पहिले स्थान पटकावले. दुसऱ्या दिवसाच्या खेळानंतर प्रज्ञानानंद थोडा मागे होता. पण त्याने आपला सर्वोत्तम खेळ शेवटच्या तीन फेऱ्यांसाठी राखून ठेवला होता. त्याने क्रोएशियाच्या इव्हान सारिक, रोमानियाच्या डेक बोगदान-डॅनियल आणि नेदरलँड्सच्या अनिश गिरी यांचा पराभव करून अलीरेझाच्या आघाडीची बरोबरी साधली.



फ्रान्सचा मॅक्सिम वाशियर-लाग्रेव्ह आणि उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव यांनीही या स्पर्धेच्या रॅपिड विभागात दमदार कामगिरी केली. दोन्ही खेळाडू सध्या ११ गुणांसह अव्वलस्थानी असलेल्या दोन आघाडीच्या खेळाडूंच्या अगदी जवळ आहेत. दरम्यान, भारताचा विश्वविजेता डी. गुकेश आणि जर्मनीचा व्हिन्सेंट केमर प्रत्येकी १० गुणांसह त्याच्या मागे आहेत.

ब्लिट्झ विभागात अजून १८ फेऱ्या बाकी आहेत. सध्या, अनिश गिरी आठ गुणांवर असून तो नेदरलँड्सच्या डीक बोगदान-डॅनियल आणि जॉर्डन व्हॅन फोरिस्ट यांच्यापेक्षा पूर्ण एक गुणाने पुढे आहे. याउलट, इव्हान सारिककडे फक्त दोन गुण असून तो गुणतालिकेत शेवटच्या स्थानावर आहे.

प्रज्ञानानंदची गेल्या तीन फेऱ्यांमध्ये प्रतिस्पर्ध्यांवर मात

प्रज्ञानानंदसाठी दिवसाची सुरुवात सकारात्मक झाली. स्पर्धेत संघर्ष करणाऱ्या इव्हान सारिकविरुद्ध, या भारतीय खेळाडूने सुरुवातीच्या चालींपासूनच स्वतःला एका मजबूत स्थितीत आणले. प्रज्ञानानंदच्या कॅरो-कॅन डिफेन्समुळे त्याला सुरुवातीपासूनच एक भक्कम स्थिती मिळाली. जरी त्याचे विजयात रूपांतर करण्यास बराच वेळ लागला, तरी प्रज्ञानानंदने खेळावर पूर्ण नियंत्रण ठेवले. दुसऱ्या सामन्यात, प्रज्ञानानंदने पेट्रॉफ डिफेन्सचा वापर करून डेक बोगदान-डॅनियलचा बचाव पूर्णपणे मोडून काढला. १५ व्या चालीपर्यंत सामन्याचा निकाल स्पष्ट झाला होता. त्या रोमानियन खेळाडूने पटकन एक प्यादे गमावले आणि त्याला सावरता आले नाही.

दिवसाच्या शेवटच्या सामन्यात, प्रज्ञानानंदने सर्वसाधारणपणे बलाढ्य मानल्या जाणाऱ्या अनिश गिरीविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला. त्याने कॅटलान ओपनिंगचा वापर करून एक प्यादे जिंकले आणि त्यानंतर उत्कृष्ट डावपेचांचे कौशल्य दाखवत तो सामना प्रभावीपणे संपवला. सामना केवळ ३४ चालींमध्ये संपला.

### विश्वविजेता डी. गुकेशसाठी संमिश्र यश

प्रज्ञानंदच्या विपरीत, सर्वांत तरुण विश्वविजेता, डी. गुकेशसाठी हा दिवस संमिश्र होता. त्याने आपले तिन्ही सामने केवळ बरोबरीत सोडवले, ज्यामुळे तो अव्वल स्थानाच्या शर्यतीत थोडा मागे पडला. अब्दुसत्तोरोव, केमर आणि अलीरेझा या तिन्ही खेळाडूंनी गुकेशसोबत गुण विभागून घेतले.

## कसोटी पदार्पणात लाहिरू उदाराची दीडशतकी खेळी

**अँटिग्वा :** वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने दमदार सुरुवात केली आहे. सामन्याच्या पहिल्या दिवशी संघाने ५ गडी गमावून ३३८ धावा केल्या आहेत. ३२ वर्षीय सलामीवीर लाहिरू उदाराने आपल्या पदार्पणात २४८ चेंडूंमध्ये १८८ धावा केल्या आणि द्विशतक पूर्ण करण्यापासून तो केवळ १२ धावा दूर राहिला.

अँटिग्वा येथील सर व्हिव्ह रिचर्डस् स्टेडियमवर श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाथुम निस्संकाच्या जागी उदाराचा अंतिम ११ खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला. पहिल्या दिवसाचा खेळ संपण्याच्या केवळ अर्धा तास आधी, वेस्ट इंडिजने दोन बळी घेऊन सामन्यात थोडक्यात पुनरागमन केले. सोनल दिनुशा ५ धावांवर नाबाद राहिला. श्रीलंकेची सुरुवात खूपच खराब झाली. सामन्याच्या पहिल्या तासात, वेगवान गोलंदाज शमर जोसेफने निशान मदुष्का आणि दिनेश चंडीमल यांना स्वस्तात बाद केले.

## ट्रान्सपोर्ट कंपनीची ६५ लाखांची फसवणूक

**पिंपरी :** एका नामांकित ट्रान्सपोर्ट कंपनीच्या मालकाकडून वेळोवेळी आगाऊ रक्कम घेऊन ६५ लाख ६८ हजारांची फसवणूक केली. ही घटना डिसेंबर २०२५ ते १२ मार्च २०२६ या कालावधीत भोसरी येथील स्पाईन रोडवरील घडली आहे. जयंत्रीकुमारी नितेन्द्र प्रसाद (रा. झारखंड) आणि अनिल अरुण नरळे (रा. काळेवाडी, पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अनिल हरिभाऊ ढोबळे (वय ३५, रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

HOUSING FINANCE BAJAJ

**बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

**CIN:** L65910PN2008PLC132228
**नोंदणीकृत कार्यालय:** बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई - पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११०३५, महाराष्ट्र
**ईमेल आयडी:** bhflinvestor.service@bajajhousing.co.in
**संकेतस्थळ:** https://www.bajajhousingfinance.in
**दूरध्वनी:** (०२०) ७१८७ ८०६०

**१८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-मतदानाची माहिती यांची सूचना**

याद्वारे **सूचना** दिली जात आहे की **बुधवार, दिनांक २९ जुलै २०२६ रोजी दुपारी ३:४५ वाजता (आयएसटी)** १८वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('ई-एजीएम') बोलावल्या जाणाऱ्या सूचनेमध्ये सांगितलेले कामकाज पार पाडण्यासाठी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडून ('एमसीए') दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेले सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ ('सेबी लिस्टिंग विनियम') यांसहपठीत कंपनी अधिनियम, २०१३ ('अधिनियम') मधील लागू असलेल्या तरतुदींचे आणि त्यांतर्गत तयार केलेल्या नियमांचे पालन करत कंपनीच्या सदस्यांची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, सदस्यांनी एका सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित न राहता, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी')/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') आयोजित केली जाणार आहे.

वरील दिलेल्यांचे पालन करत कंपनीने ई-एजीएम ची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ साठीचा वार्षिक अहवाल व्यवसाय जबाबदारी आणि शाश्वतता अहवाला ('बीआरएसआर') सह शनिवारी, दिनांक ४ जुलै २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सदस्यांना पाठवला आहे ज्यांनी शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ रोजी (सूचना पाठवण्याच्या उद्देशाने निश्चित केलेली 'कट-ऑफ' तारीख) शेअर्स धारण केलेले आहेत, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे किंवा रजिस्ट्रार टू अॅन इश्यू आणि शेअर ट्रान्सफर एजंट, म्हणजेच केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ('केफिन') / डिपॉझिटरी पार्टिसिपंट(ट्स) ('डीपी') यांच्याकडे नोंदणीकृत आहेत.

सेबी लिस्टिंग विनियमांच्या तरतुदींच्या अनुषंगाने, ई-एजीएम ची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ चा वार्षिक अहवाल व्यवसाय जबाबदारी आणि शाश्वतता अहवालासह पाहण्यासाठी वेब-लिंक आणि क्यूआर कोड असलेले एक पत्र, त्याच्या मार्गासह दूरस्थ ई-मतदान करण्यासाठीच्या लॉगिन क्रेडेन्शियल्ससह कंपनीकडे / केफिन / डीपींकडे स्वतःचा ईमेल पत्ता ज्या सदस्यांनी नोंदवलेला नाही, त्यांना पाठवले जात आहे.

सूचना आणि वार्षिक अहवाल यांची प्रत्यक्ष प्रत विनंती केल्यावर सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवली जाईल.

उपरोक्त दस्तऐवज कंपनीच्या https://www.bajajhousingfinance.in/annual-reports आणि शेअर बाजारांच्या म्हणजे बीएसई लिमिटेड च्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com या संकेतस्थळांवर तसेच केफिनच्या https://evoting.kfintech.com/public/Downloads.aspx या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहेत.

अधिनियमचे कलम १०८ आणि सुधारणा केल्यानुसार कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २०, आणि सेबी लिस्टिंग विनियमांचे विनियम ४४ आणि दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजीचे सेबी मास्टर परिपत्रक यांच्या तरतुदींचे पालन करत, सदस्यांना याद्वारे पुढे सूचित करण्यात येते की:

अ) कंपनी तिच्या सदस्यांना ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे जेणेकरून त्यांना ई-एजीएम च्या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करता येईल. केफिनला ई-एजीएम साठी ई-मतदान सेवा प्रदाता नियुक्त केले गेले आहे.

ब) दूरस्थ ई-मतदान करून किंवा ई-एजीएम मध्ये मतदान करून ई-एजीएम च्या सूचनेत नमूद केलेला व्यवसाय पार पाडता येईल.

क) दूरस्थ ई-मतदान हे **शनिवार, दिनांक २५ जुलै २०२६ (सकाळी ९:०० वाजता आयएसटी)** पासून सुरू करण्यात येणार असून **मंगळवार, दिनांक २८ जुलै २०२६ (सायंकाळी ५:०० वाजता आयएसटी)** रोजी संपणार आहे. सदर तारखेनंतर मतदान करता येणार नाही आणि दूरस्स्थ इ-मतदान सुविधा ताबडतोब थांबवली जाईल.

ड) बुधवार, २२ जुलै २०२६ ('कट-ऑफ तारीख') ही ई-मतदानाच्या उद्देशासाठी कट-ऑफ तारीख असेल.

ई) सूचना पाठवली गेल्यानंतर शेअर्स खरेदी करून कंपनीचे सदस्य झालेल्या व्यक्तींना आणि कट-ऑफ तारखेनुसार म्हणजेच **बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६** रोजी पात्र सदस्यांना केफिनकडून युजर आयडी आणि पासवर्ड मिळविता येईल. त्यासाठी त्यांना त्यांच्या नोंदवलेल्या ईमेल-आयडी वरून evoting@kfintech.com वर त्यांची विनंती पाठवावी लागणार आहे.

ख) दूरस्थ ई-मतदानासाठीचा युजर आयडी आणि पासवर्ड ई-मेलद्वारे त्या सदस्यांना कळवले गेले आहेत, ज्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदवलेला आहे. कंपनी किंवा केफिनकडे ई-मेल पत्ता नोंदवलेला नसलेल्या सदस्यांसाठी युजर आयडी आणि पासवर्ड त्यांना आर्थिक वर्ष २०२६ चा वार्षिक अहवाल आणि ई-एजीएम ची सूचना पाहण्यासाठी वेब-लिंक आणि क्यूआर कोड असलेल्या पत्रावरच दिले आहेत.

ग) असे सदस्य जे सभेला उपस्थित आहेत आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे ठरावांवर आपले मतदान केलेले नाही आणि ज्यांना अन्यथा असे करण्यास बंदी नाही, एजीएम मध्ये दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. ई-एजीएम च्या सूचनेत ई-एजीएम मध्ये मतदान करण्याच्या सूचना प्रदान केल्या गेल्या आहेत.

घ) ई-एजीएम पूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मतदान केलेल्या सदस्यांना देखील ई-एजीएम मध्ये उपस्थित राहता येईल/भाग घेता येईल, परंतु त्यांना ई-एजीएम मध्ये पुन्हा मतदान करता येणार नाही.

च) कट-ऑफ तारीख म्हणजेच बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६ रोजी डिपॉझिटरीज ने राखलेल्या सदस्यांच्या नोंदवहीत किंवा लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत नाव नोंदवले गेलेल्या व्यक्तीस फक्त दूरस्थ ई-मतदान तसेच ई-एजीएम मध्ये ई-मतदान सुविधा वापरण्याचा अधिकार असेल. कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटल मध्ये सदस्यांनी धारण केलेल्या इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात त्यांना मतदानाचे अधिकार असतील.

झ) ई-मतदान संबंधित कोणत्याही चौकशींसाठी / तक्रारींसाठी, सदस्यांना https://evoting.kfintech.com येथे उपलब्ध वारंवार विचारले जाणारे प्रश्न ('FAQs') आणि ई-मतदान वापरकर्ता मार्गदर्शक पाहता येतील. याशिवाय, सदस्यांना ई-मतदान संबंधित तक्रारी सोडवण्यासाठी खाली दिलेल्या संपर्क तपशीलांवर संपर्क साधता येईल:

**मोहम्मद मोहसिनुद्दीन**
असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट - कॉर्पोरेट रजिस्ट्री
केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड
**युनिट :** बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
सेलेनियम बिल्डिंग, टॉवर बी,
प्लॉट क्र. ३१ आणि ३२, आर्थिक जिल्हा, नानकरामगुडा,
सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी, तेलंगणा - ५०० ०३२.
**ईमेल आयडी:** einward.ris@kfintech.com
टोल फ्री क्रमांक : १८०० ३०९ ४००१

**अतुल पाटनी**
कंपनी सचिव
**बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
५वा मजला, बीर सेरेब्रम आयटी पार्क, कुमार सिटी,
कल्याणी नगर, पुणे - ४११ ०१४, महाराष्ट्र, भारत
**ई-मेल आयडी:**
bhflinvestor.service@bajajhousing.co.in
दूरध्वनी क्रमांक: (०२०) ७१८७ ८०६०

ञ) ज्या शेअरधारकांनी डीमटेरिअलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण केले आहेत, त्यांना डिपॉझिटरी(ज) (म्हणजेच, एनएसडीएल आणि सीडीएसएल) मार्फत ई-मतदान संदर्भातील कोणत्याही समस्यांसाठी, खाली दिलेल्या संपर्क तपशिलांवर संपर्क साधता येईल:

| एनएसडीएल | सीडीएसएल |
| --- | --- |
| ईमेल आयडी : evoting@nsdl.co.in<br>टोल फ्री क्रमांक: ०२२ ४८८६ ७००० / ०२२ २४९९ ७००० | ईमेल आयडी: helpdesk.evoting@cdslindia.com<br>टोल फ्री क्रमांक: १८०० २२ ५५ ३३ |

सदस्यांनी आपला ईमेल पत्ता आणि इतर केवायसी तपशील अद्ययावत करावेत, अशी विनंती आहे. यासाठी त्यांनी आवश्यक सहाय्यक दस्तऐवजांसह फॉर्म ISR-1 (https://www.bajajhousingfinance.in/investor-relations-investor-request-forms या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) योग्यरित्या भरून आणि सही करून प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी केफिनकडे सादर करावा. ही विनंती या संदर्भातील कायदेशीर आवश्यकतांचे पालन केल्याच्या अधीन राहून नोंदवली जाईल. डिमॅट स्वरूपात धारण केलेल्या शेअर्सच्या बाबतीत, सदस्यांनी उपरोक्त तपशील अद्ययावत करण्यासाठी त्यांच्या संबंधित डीपींकडे संपर्क साधावा, अशी विनंती आहे.

**बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** करीता
सही/-
**अतुल पाटनी**
कंपनी सचिव

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: ४ जुलै २०२६**

# जोकोविचची फेडररच्या विक्रमाशी बरोबरी

### विम्बल्डनचा १०५ वा सामना जिंकला

**लंडन :** नोव्हाक जोकोविचने विम्बल्डनमध्ये पुरुष एकेरीतील सर्वाधिक विजयांचा रॉजर फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली. या सर्बियन दिग्गजाने फ्रान्सच्या आर्थर रिंडरनेकचा पराभव करून ऑल इंग्लंड क्लबमध्ये आपला १०५ वा विजय नोंदवला.



विम्बल्डनच्या इतिहासात, केवळ मार्टिना नवरातिलोव्हाने १२० विजयांसह जोकोविचला मागे टाकले आहे. महिलांच्या गटात, चौथ्या फेरीत आर्यना साबालेन्का आणि नाओमी ओसाका एकमेकींविरुद्ध खेळतील.

३९ वर्षीय जोकोविचने २५ व्या मानांकित आर्थर रिंडरनेकचा ७-५, ६-४, १-६, ७-६ (७-४) असा पराभव केला. त्याने पहिले दोन सेट जिंकले, पण रिंडरनेकने तिसरा सेट ६-१ ने जिंकून पुनरागमन केले. चौथा सेट टायब्रेकरमध्ये जोकोविचने जिंकला.

जवळपास तीन तास चाललेल्या सामन्याच्या शेवटच्या गुणावर, रिंडरनेकचा ड्रॉप शॉट वाचवण्यासाठी जोकोविचने झेप घेतली. दोन्ही खेळाडू कोर्टवर पडले, पण जोकोविचने तो गुण जिंकला. त्याच्या विजयामुळे सेंटर कोर्टवरील प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला.

विक्रमाची बरोबरी केल्यानंतर, जोकोविच हसत म्हणाला, मी रॉजरसोबत १०६ व्या सामन्याचा प्रस्ताव ठेवतो. जो कोणी जिंकेल, तो विक्रम आपल्या नावावर करेल. त्याने पुढे सांगितले की, या ऐतिहासिक कोर्टवर इतिहासाचा भाग बनणे हे त्याच्या लहानपणीच्या स्वप्नांपैकी एक होते.

# लिओनेल मेस्सीचे विश्वचषकात २० गोल

### एमबाप्पेला मागे टाकले; गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर

**अमेरिका :** अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीने सलग आठव्या फिफा विश्वचषक सामन्यात किमान एक गोल केला आहे. मेस्सीने केप वर्दे विरुद्ध सामन्याच्या २९ व्या मिनिटाला आपला २० वा विश्वचषक गोल केला. तो विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत अव्वल स्थानी कायम आहे. फ्रान्सचा किलियन एमबाप्पे त्याच्यापेक्षा दोन गोलने मागे आहे.



### मेस्सीचा या विश्वचषकात सातवा गोल

या स्पर्धेतील हा मेस्सीचा सातवा गोल होता आणि तो गोल्डन बूटच्या शर्यतीत एमबाप्पेपेक्षा एका गोलने मागे आहे. मेस्सीने गेल्या आठ विश्वचषक सामन्यांमध्ये १२ गोल केले आहेत. मार्टिनेझच्या पासवर केप व्हर्डीचा स्टार गोलकीपर वोजिन्हा याला चकवून मेस्सीने गोल केला. मेस्सी आणि एम्बाप्पे यांच्या व्यतिरिक्त, नॉर्वेचा अर्लिंग हालंड आणि इंग्लंडचा हॅरी केन हे देखील प्रत्येकी पाच गोलांसह विश्वचषकात सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या गोल्डन बूट पुरस्काराच्या शर्यतीत आहेत. फ्रान्सचा उस्मान डेम्बेले, स्पेनचा मिकेल ओयार्झाबाल, ब्राझीलचा विनिसियस ज्युनियर आणि सेनेगलचा इस्माईला सार यांनी प्रत्येकी चार गोल केले आहेत. सेनेगल स्पर्धेतून बाहेर पडल्यामुळे सार शर्यतीतून बाहेर आहे.

नॉर्वे, इंग्लंड आणि फ्रान्स हे संघ अंतिम १६ मध्ये आहेत. अर्जेंटिनानेही केप व्हर्डीला हरवून पुढील फेरीत प्रवेश केला आहे. मेस्सीने आजपर्यंत कधीही गोल्डन बूट जिंकलेला नाही. २०२२ च्या विश्वचषकात तो सात गोलांसह एम्बाप्पेपेक्षा एका गोलने मागे राहिला होता, तर २०१४ मध्ये तो चार गोलांसह संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर होता.

# फार्मा इलेव्हन, ब्रेव्हहार्ट कॉर्पोरेट क्लब, कल्याण क्लब संघ विजयी

**स्पार्टन मान्सून लीग**

**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब पुणे तर्फे आयोजित सहाव्या 'स्पार्टन मान्सून लीग' अजिंक्यपद मिक्स कॉर्पोरेट टी-२० क्रिकेट स्पर्धेत फार्मा इलेव्हन, ब्रेव्हहार्ट कॉर्पोरेट क्रिकेट क्लब आणि कल्याण क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्म क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत क्षितीज सनदी याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर फार्मा इलेव्हन संघाने जीएसके क्रिकेट क्लबचा ५९ धावांनी सहज पराभव केला. फार्मा इलेव्हनने २२८ धावांचे लक्ष्य उभे केले होते. क्षितीज सनदी (६२ धावा) आणि किरण दातार (६८ धावा) यांनी धावा केल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना जीएसके क्रिकेट क्लबचा डाव १६९ धावांवर आटोपला. परीमल मोकाशी याने ७२ धावांची खेळी करून एकहाती लढा दिला.

# लॉन टेनिस स्पर्धेत संध्याराणी बंडगर, गिरिजा येरवडेकर अंतिम फेरीत

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेतर्फे अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना आणि महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित केलेल्या वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत ४० वर्षांवरील महिला गटात उपांत्य फेरीत सोलापूरच्या संध्याराणी बंडगर, गिरिजा येरवडेकर यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला. एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ४० वर्षांवरील महिला गटात पहिल्या उपांत्य फेरीच्या लढतीत अव्वल मानांकित सोलापूरच्या संध्याराणी बंडगरने शितल गोरुलेचा ६-४, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात दुसऱ्या मानांकित गिरिजा येरवडेकरने धर्मिष्ठावर ६-१, ६-० असा विजय मिळवत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

# गरजू दिव्यांग महिलेला व्हीलचेअर प्रदान



**पुणे :** दिव्यांग मित्र अभियानांतर्गत मनसे नेते तथा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित राज ठाकरे यांच्या हस्ते गरजू दिव्यांग महिलेला व्हीलचेअर प्रातिनिधिक स्वरूपात प्रदान करण्यात आली. हा उपक्रम सामाजिक कार्यकर्ते सचिन म्हसे, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य सारंग सराफ यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे. यावेळी मनविसे प्रमुख संघटक प्रशांत कनोजिया, सचिव आशिष साबळे, राज्य कार्यकारिणी सदस्य अभिषेक थिटे, रुपेश घोलप, शहराध्यक्ष धनंजय दळवी, विभाग अध्यक्ष आशुतोष माने, रुपेश चांदेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. या छोट्याशा कृतीने संपुर्ण कुटुंबांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहुन समाधान वाटले, अशी प्रतिक्रिया अमित ठाकरे यांनी दिली.

# वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**पुणे :** माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा ११३वा जयंती उत्सव शेतकी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे साजरा झाला. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय बंजारा क्रांती दल पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष मूर्ती जयराम राठोड होते. कार्यक्रमास महापौर मंजुश्री नागपुरे, नगरसेवक सुभाष नाणेकर, काका चव्हाण, अनिता इंगळे व धनश्री कोल्हे उपस्थित होते. बंजारा समाजाचा मेळावाही यानिमित्त झाला. मूर्ती जयराम राठोड व महापौर नागपुरे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मूर्तीभाऊ राठोड यांनी महापौर नागपुरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.




कमला राठोड, मंगल पवार, मोतीबाई उडते, तसेच बंजारा समाजातील बहुसंख्य स्त्री-पुरुष उपस्थित होते. जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रामदास हिरालाल राठोड यांची पुणे जिल्हा राष्ट्रीय बंजारा क्रांती दल ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष म्हणून यावेळी निवड झाली.